महाराष्ट्र शासन
गृहविभाग
**पोलीस अधीक्षक, कार्यालय, लोहमार्ग, पुणे**
जुने सीआयडी ऑफीस कंपाउंड, शिवाजीनगर,संगम ब्रीज जवळ, पुणे
दुरध्वनी क्रमांक - ०२० - २५५४१५३३
फॅक्सक्रमांक - ०२० - २५५४४६३१
ई मेल - sp.railways.pune@mahapolice.gov.in

जा.क्र.प्रलि / आस्था / तात्पुरती पदोन्नती /पोना ते पोहवा/माहे-०८/२०२३/5642 पुणे दिनांक१०/०८/२०२३

**विषय :-** पोलीस नाईक ते पोलीस हवालदार पदी पदोन्नतीबाबत..

----oooo---

**आदेश -**

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या याचिका क्रमांक २७९७/२०१५ वरील दि.०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७.०५.२०२१ अन्वये खालील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

जे मागासवर्गीय अधिकारी कर्मचारी दि.२५.०५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले आहेत, असे अधिकारी / कर्मचारी

(अ) दिनांक २५.०५.२००४ रोजी किंवा त्यापूर्वी शासन सेतेत रुजू झाले असल्यास ते त्यांच्या दिनांक २५/०५/२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील व,

(ब) दिनांक २५.०५.२००४ नंतर शासन सेवेत रुजू झाले असल्यास ते त्यांच्या सेवाप्रवेशाच्या मुळ सेवाजेष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील.

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७/०५/२०२१ मधील निर्देशानुसार व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही -२०१८/ प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दिनांक ०१/०८/२०१९ मधील विहीत अटीच्या अधिन राहून तसेच महाराष्ट्र शासन गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक पीएमएन-०८२१ / प्र.क्र.५३३/पोल-५ ब, दिनांक २५ फेब्रुवारी २०२२ चे शासन निर्णयातील तरतुदीनुसार पोलीस नाईक संवर्ग मृत संवर्ग (Dying Cadre) घोषित केलेनुसार पोलीस अधीक्षक लोहमार्ग पुणे आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस अंमलदार यांना पोलीस हवालदार या पदावर सेवाज्येष्ठतेच्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पोलीस आस्थापना मंडळाच्या निर्णयानुसार पदोन्नती देण्यात येत आहे. संबंधित पोलीस अंमलदार यांना नियमित पदोन्नतीबाबत सेवाजेष्ठतेचे कोणतेही अधिकार प्राप्त होणार नाहीत.

Scanned with OKEN Scanner

**भाग-१**

खालील नमुद पोलीस अंमलदार यांना त्यांचे नावासमोर दर्शविले प्रमाणे पोलीस हवालदार या पदावर कार्यभार स्विकारले पासुन तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

| पदनाम | वेतन स्तर | वेतनबँड | विशेष वेतन |
|---|---|---|---|
| पोलीस नाईक | S-८ | २५५००-८११००/- | ७५०/- |
| पोलीस हवालदार | S-९ | २६४००-८३६००/- | ७५०/- |

| अ.क्र. | पदनाम | ब.नं | पोलीस अंमलदाराचे नांव | जात प्रवर्ग | नेमणूक |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोना | ६३१ | सुनिल लक्ष्मण गायकवाड | अजा | सोलापुर लो.पो. ठाणे |
| २ | मपोना | १३५७ | प्रियंका चंद्रकांत शिर्के | खुला | मुख्यालय |
| ३ | पोना | ८७ | प्रमोद बिराप्पा सुरवसे | भज-क | सोलापुर लो.पो. ठाणे |
| ४ | पोना | ७७३ | सचिन किसन यादव | इमाव | कोर्ट पैरवी |
| ५ | पोना | ६७२ | हर्षल हौशीराम तोरणे | अजा | दौंड लो.पो. ठाणे |
| ६ | पोना | ३५७ | निशांत प्रभाकर कसबे | अजा | पुणे लो.पो. ठाणे |
| ७ | पोना | ३४७ | मनोहर बाबुलाल भोई | भज-ब | दौंड लो.पो. ठाणे |
| ८ | पोना | ३८८ | अमोल मोहनसिंग चव्हाण | खुला | सोलापूर लो.पो. ठाणे |
| ९ | पोना | २२६ | हरिष माधव भिसे | भज-ब | पुणे लो.पो. ठाणे |
| १० | मपोना | १३०९ | पुष्पा जालिंदर गायकर | इमाव | अहमदनगर लो.पो. ठाणे |
| ११ | पोना | ०५ | जयंत शिवाजी पाटील | भज-क | मिरज लो.पो. ठाणे |
| १२ | पोना | २८ | प्रमोद गोवर्धन नागरगोजे | भज-ड | पुणे लो.पो. ठाणे |
| १३ | पोना | ०१ | पंकज प्रमोद मुळे | इमाव | मुख्यालय |

वरील पदोन्नती मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहे.

राज्य राखीव पोलीस बल गटातील पोलीस अंमलदार यांची सेवाजेष्ठता गृह विभाग शासन शुद्धीपत्रक क्र.पीएमएन-०३१४/२०३/प्र.क्र.६८/पोल-५ब, दि.१० डिसेंबर, २०१८ अन्वये लावण्यात आलेली असुन त्यानुसार त्यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे.

तात्पुरती पदोन्नती दिलेल्या वरील पोलीस अंमलदार यांचेविरुद्ध सध्या फौजदारी आरोपाचा गुन्हा दाखल आहे अगर कसे याबाबत त्यांचेकडून प्रभारी अधिकारी यांनी लेखी स्वरुपात बंधपत्र घेऊन या कार्यालयास रिपोर्ट सोबत तात्काळ सादर करावे. लेखी निवेदनामध्ये पदोन्नती दिलेले अंमलदार यांचेविरुद्ध गुन्हा दाखल असेल अथवा न्यायप्रविष्ट असेल अथवा न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध वरिष्ठ न्यायालयात अपील प्रलंबित असेल तर सदर अंमलदार यांना पदोन्नती स्विकारण्यास देऊ नये, त्यांची सविस्तर माहिती नेमणुकीचे प्रभारी अधिकारी यांनी या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तदनंतर सदर अंमलदार यांना देण्यात आलेली पदोन्नती काढून घेणेची कार्यवाही या कार्यालयाकडून तात्काळ करण्यात येईल.

तात्पुरती पदोन्नती दिलेल्या वरील पोलीस अंमलदार हे सध्या निलंबित असतील, त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करण्यात येऊन दोषारोप बजावून शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरु केली असेल, वेतनवाढ तहकुब शिक्षा

Scanned with OKEN Scanner

भोगत असतील, तसेच विहित कालावधीसाठी वेतन खालच्या टप्यावर आणण्याची शिक्षा झाली असेल व सदर शिक्षा पदोन्नती आदेश दिनांकास समाप्त झाली नसेल, अशा पोलीस अंमलदार यांना नेमणूकीचे प्रभारी अधिकारी यांनी पदोन्नती स्विकारण्यास देऊ नये, त्यांची सविस्तर माहिती या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावी. तदनंतर सदर अंमलदार यांना देण्यात आलेली पदोन्नती काढून घेणेची कार्यवाही या कार्यालयाकडून तात्काळ करण्यात येईल.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने तदनंतर शासनाकडील सुधारीत निर्णयानुसार सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार, पोलीस नाईक व पोलीस शिपाई पदाची निवडसुची तसेच ज्येष्ठतासुची सुधारीत झाल्यास, वरील पदोन्नती दिलेल्या पोलीस अंमलदार यांचे ज्येष्ठतासुचीतील स्थान खाली जाणे अथवा पदोन्नती काढून घेतल्या जातील याची नोंद पदोन्नती देण्यात आलेल्या पोलीस अंमलदार यांनी घेण्याची आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही २०१७/प्र.क्र.४६२/कार्या -१२, दि.०३ जुलै, २०१८ मध्ये नमुद केलेनुसार संगणक हाताळणी / वापराबाबतचे ज्ञान या संदर्भातील विहीत प्रमाणपत्र सादर न केल्यास , पदोन्नती रोखणेबाबत निर्देश दिलेप्रमाणे ज्या पोलीस अंमलदार यांनी संगणक हाताळणी / वापराबाबतचे ज्ञान संदर्भातील विहित प्रमाणपत्र सादर केले आहे अशा पोलीस कर्मचारी यांना सेवाजेष्ठतेनुसार तात्पुरती पदोन्नती देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही २०१५/ प्र.क्र.३०३/कां.१२, दिनांक १२/०९/२०१६ अन्वये, एखाद्या कर्मचाऱ्याने त्याची पदोन्नतीसाठी निवड झाल्यांनतर अथवा तत्पूर्वीच पदोन्नतीचे पद स्विकारण्यास नकार दर्शविल्यास त्याचे नाव पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या निवड यादीतून काढून टाकणेत येईल व पुढील दोन वर्षे होणाऱ्या निवड सुचीमध्ये संबंधित कर्मचाऱ्याच्या नावाचा विचार न करता तिसऱ्या वर्षाच्या निवड सुचीत संबंधित कर्मचाऱ्याची पात्रता तपासण्यात येईल तसेच सदर शासन निर्णयातील विहित केलेल्या अटीप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल, याबाबत प्रभारी अधिकारी यांनी पदोन्नत झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना समज देण्यात यावी.

पदोन्नत देण्यात आलेल्या वरील पोलीस अंमलदार यांनी पदोन्नती स्विकारली नसल्यास, त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येऊन त्यांना यापूर्वी कालबद्ध पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनाचा लाभ मंजुर केला असल्यास तो प्रचलित शासन निर्णयानुसार काढून घेण्यात येईल. तसेच सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला, दुसरा व तिसरा लाभ प्रचलित शासन निर्णयानुसार मंजुर करण्यात येणार नाही याची नोंद संबंधित पोलीस अंमलदार यांनी घेण्याची आहे.

शासन निर्णय वित्त विभाग क्र.पीएआय/१०८२/सीआर-११००(१)/एसईआर-३, दिनांक ०६/११/१९८४ प्रमाणे पदोन्नती झाल्यावर कनिष्ठ पदातील वेतन वाढीनंतर पदोन्नतीच्या पदातील वेतन निश्चितीसाठी विकल्प द्यावयाचा असेल अशा कर्मचाऱ्यांनी एक महिन्याच्या आत विकल्प या कार्यालयास सादर करावा. त्यानुसार त्यांची वेतन निश्चिती करण्यात येईल. याबाबत पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी सदरची बाबत प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणुन दयावी व मुदतीत त्यांचे अर्ज या कार्यालयास विकल्पासह सादर करावे. एक महिन्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

संबंधित प्रभारी अधिकारी यांनी सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.वशिअ/१२१४/प्र.क्र..५२(२)/११, दि.१७/११/२०१४ परिपत्रकात नमुद केल्याप्रमाणे पदोन्नती दिलेल्या पोलीस अंमलदार यांनी मार्च-२०२३ अखेर पावेतोची मत्ता व दायित्वाची विवरणपत्रे सादर केल्याची पडताळणी करुन किंवा सादर केल्यानंतरच त्यांना पदोन्नती स्विकारण्यास परवानगी द्यावी.

वरील पदोन्नत झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांपैकी जे पोलीस अंमलदार रुग्णालयीन रजा / गैरहजर / अर्जित रजेवर आहेत त्यांना सदर पदोन्नतीच्या प्रत्यक्ष लाभ ते कर्तव्यावर हजर झालेल्या दिनांकापासून देण्यात यावा व त्याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

Scanned with OKEN Scanner

सदर आदेशाची प्रत सर्व संबंधित पदोन्नत पोलीस अंमलदार यांना देण्यात यावी व ज्या पोलीस अंमलदार यांनी पदोन्नती स्विकारली असेल त्यांची पदोन्नती स्किकृती बाबतचे अहवाल या कार्यालयात सादर करावेत. तसेच जे पोलीस अंमलदार पदोन्नती नाकारतील अशा पोलीस अंमलदार यांचे पदोन्नती नाकारलेबाबत चा अहवाल त्यांचे अर्जासह इकडील कार्यालयास सादर करावा. सदरबाबत प्रभारी अधिकाऱ्यांनी स्वत: दक्षता घ्यावी.

**:- सर्व पोलीस अंमलदारांना पदोन्नतीच्या हार्दिक शुभेच्छा-:**

**( श्रीकांत य धिवरे ) भा.पो.से.**
**पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे**

**प्रति,**

१. प्रभारी अधिकारी पुणे / मिरज /कुर्डूवाडी /दौंड/सोलापुर/अहमदनगर पोलीस ठाणे
२.रापोनि पोलीस मुख्यालय लोहमार्ग खडकी पुणे
३.सर्व शाखा प्रमुख/ जिविशा /सुरक्षा शाखा/मानवी संसाधन शाखा/ स्थागुशा/नियंत्रण कक्ष/श्वान पथक/ महिला कक्ष /कोर्ट पैरवी

**प्रत,** प्रमुख लिपीक लेखा शाखा / वेतन लिपीक
पोलीस राजपत्रक /आस्था-२ लोहमार्ग पुणे

**प्रत,** अधिदान व लेखा अधिकारी, पुणे

Scanned with OKEN Scanner